# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः11.06.2026** **वारःगुरुवार**

---

1. देशाच्या प्रगतीसाठी धाडसी निर्णयांची प्रक्रिया सुरूच राहाणार- रालोआच्या अभिनंदन बैठकीत पंतप्रधानांचं ठाम प्रतिपादन
2. पंतप्रधानांचा विक्रमी कालखंड देशासह राज्याच्या विकासाचा महत्त्वपूर्ण काळ असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे गौरवोद्गार
3. जागतिक दर्जाची आरोग्यसेवा देणाऱ्या मेडिसिटीच्या उभारणीसाठी राज्यसरकार आणि क्लीव्हलँड क्लिनिक दरम्यान सामंजस्य करार आणि
4. राज्यात विविध जिल्ह्यांमध्ये बुडून आठ जणांचा मृत्यू

**<u>पीएम ठराव</u>**

भारताचे सर्वाधिक काळ नेतृत्व करणारे निवडून येणारे पंतप्रधान होण्याचा मान मिळवल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर सर्वच स्तरांतून काल अभिनंदनाचा वर्षाव झाला. जागतिक स्तरावरील नेत्यांनीही त्यांचं अभिनंदन केले. राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सर्व घटक पक्षांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं कौतुक करणारा ठराव काल मंजूर केला. नवी दिल्लीतील भारत मंडपम् इथं आयोजित रालोआच्या बैठकीत विशेष राजकीय ठराव मांडण्यात आला, त्याला सर्व घटकपक्षांनी अनुमोदन दिले.

या परिषदेला संबोधित करताना, पंतप्रधानांनी देशातल्या 140 कोटी जनतेच्या आशा-आकांक्षाची नक्की पूर्तता होईल असा ठाम विश्वास व्यक्त केला. 2014 मध्ये रालोआ सरकारवर विश्वास ठेवलेल्या जनतेचा आत्मविश्वास आता दुणावला आहे. योग्य उद्दीष्ट ठेवून सरकार चालवलं तर वेगानं विकास घडू शकतो हे पहिल्यांदा घडलं, इतक्या दीर्घकाळ सेवेची संधी मिळणं हे जनतेच्या परिपक्वतेचं लक्षण असल्याचंही मोदी यांनी नमूद केलं.

गेल्या बारा वर्षांत सरकारनं 25 कोटींहून अधिक नागरिकांना गरिबीतून वर काढलं आहे. विकसित भारत हे केवळ सरकारचं, राजकीय पक्षाचं स्वप्न राहिलं नसून तो देशातल्या प्रत्येक व्यक्तीचा संकल्प झाला असल्याचंही त्यांनी नमूद केलं. देशाचा वाढता विकासदर, तिहेरी तलाकविरोधी कायदा, सीएए, भारतीय न्याय संहिता, एक पद एक पेन्शन आदींचा संदर्भ देत देशाच्या प्रगतीसाठी धाडसी निर्णयांची प्रक्रिया अशीच सुरू राहिल असं ठाम प्रतिपादन त्यांनी केलं.

एका तपाचा हा प्रवास केवळ आकडेवारीचा नसून देशानं पहिल्यांदाच आपली क्षमता ओळखून अस्थिरतेच्या काळात महत्त्वाकांक्षी उद्दीष्ट साध्य करण्यासाठी अथक प्रयत्न केल्याचं मोदी यांनी नमूद केलं. या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह रालोआची सत्ता असलेल्या सर्व 22 राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री, तसंच आघाडीतील भागीदार पक्षांचे नेते उपस्थित होते.

**<u>पंतप्रधान-मुख्यमंत्री</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारकीर्दीत देशाबरोबरच राज्याच्या विकासालाही नवी दिशा मिळाली आहे, पंतप्रधानांचा हा विक्रमी कालखंड देशाच्या विकासाचा महत्त्वपूर्ण काळ असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिल्लीत

वार्ताहरांशी बोलताना काढले. गेल्या बारा वर्षांत राज्याला पंतप्रधानांनी भरीव सहकार्य केलं असून, राज्यातील अनेक महत्त्वाकांक्षी पायाभूत सुविधांसह विकास प्रकल्पांना केंद्राकडून पाठिंबा मिळाल्याचं फडणवीस म्हणाले.

मोदी यांच्या पंतप्रधान पदाच्या कार्यकाळात राज्याच्या विकासाला अभूतपूर्व गती मिळाल्याचे गौरवोद्गार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काढले. देशाच्या 21 वर्षांच्या विकासाचा पथदर्शी आराखडा देशासमोर ठेवल्याचं सांगून राज्याला गेल्या बारा वर्षांत दहा लाख कोटी रुपयांचा निधी मिळाल्याचं ते म्हणाले. मराठी भाषेला अभिजात दर्जा देणं असो की राज्यातल्या किल्ल्यांना युनेस्कोच्या यादीत मिळालेलं स्थान, अयोध्येचे राम मंदिर ते कलम 370 काढून टाकणे यांसारख्या ऐतिहासिक निर्णयांमुळं देशवासियांच्या अपेक्षा त्यांनी पूर्ण केल्याचं शिंदे म्हणाले. पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर देणाऱ्या ऑपरेशन सिंदूरचं यश देखील मोदी यांच्या ठाम नेतृत्वामुळं मिळाल्याचं शिंदे यांनी नमूद केलं.

**मोहोळ**

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पुणेकरांच्या वतीनं पंतप्रधानांना शुभेच्छा दिल्या. मोदी यांनी त्यांच्या विक्रमी कारकीर्दीमध्ये देशवासियांमध्ये विश्वास निर्माण केल्याचं सांगून मोहोळ म्हणाले....

**कठोरपणे कर्तव्याचे पालन, निर्णय घेण्याची इच्छाशक्ती, दूरगामी विचार करण्याची क्षमता, संकल्पना सिद्धीमध्ये परावर्तीत करण्याचे सामर्थ्य देशातील सामान्य माणसाला विकासाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेण्याची हातोटी आणि जगासमोर देशाचा सन्मान उंचावण्याचा प्रामाणिक प्रयत्न या मिश्रणातून मोदीजींचे नेतृत्व उजळले आहे. सरकार घोषणा देते आणि त्या प्रत्यक्षात येतात याची अनुभूती सामान्य नागरिक आता घेतो आहे. विकास आणि विरासत या दोन्हींचे महत्त्व समान पद्धतीने रुजवणारा नेता ही मोदीजींची सार्थ ओळख बनली आहे. जनतेच्या हृदयस्थान निर्माण करणाऱ्या मोदीजींना परमेश्वर उदंड आयुष्य आणि ऊर्जा देवो या निमित्तानं पुन्हा एकदा पुणेकरांच्या वतीनं ही शुभेच्छा.**

**सामंजस्य करार**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळालगत जवळपास अडीचशे एकर क्षेत्रावर नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटी ही जागतिक दर्जाची आरोग्यसेवा परिसंस्था उभारण्याच्या दृष्टीनं, काल क्लीव्हलँड ओहोयो इथं राज्य सरकार, क्लीव्हलँड क्लिनिक, ब्रुकफिल्ड आणि आरोधन हेल्थ सिटी यांच्या दरम्यान सामंजस्य करार करण्यात आला. मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे यांनी या ओहायो इथं या करारावर स्वाक्षरी केली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दूरस्थ माध्यमातून उपस्थित होते. रुग्णसेवा, वैद्यकीय शिक्षण, संशोधन, नवोन्मेष आणि प्रतिभा यांना एकत्र आणणारी जागतिक दर्जाची आरोग्य सेवा परिसंस्था प्रत्यक्षात येणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

**राज्यपाल पुणे संशोधन**

संशोधन आणि त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी यांच्यातील तफावत दूर करण्यासाठी विद्यापीठं, उद्योग, स्टार्टअप्स, गुंतवणूकदार आणि शासकीय संस्था यांच्यादरम्यान प्रभावी समन्वय आवश्यक असल्याचं प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केलं. पुण्यातील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आणि कॅनियस इंटरनॅशनल यांच्या सहयोगानं आयोजित 'तंत्रज्ञान संक्रमण आणि नवोपक्रम गतीवर्धन' यावरील कार्यशाळेचं उद्घाटन करताना ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉक्टर रघुनाथ माशेलकर, सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू प्राध्यापक सुनील भिरूड, कॅनियस इंटरनॅशनलचे संस्थापक अध्यक्ष मिलिंद पिंपरकर यांच्यासह विद्यार्थी, उद्योजक उपस्थित होते.

**पोलिस सन्मान राज्यपाल**

कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कर्तव्यदक्ष असणाऱ्या पोलिसांचा काल पुण्यात राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. एका खासगी माध्यम समूहाकडून आयोजित हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचं राज्यपाल यावेळी म्हणाले. विकसित भारताकडे वाटचाल करताना राष्ट्र उभारणीला मदत करणाऱ्या बातम्या आणि दृष्टीकोन

मांडण्याबाबत पत्रकारितेत विचार व्हावा असं आवाहन त्यांनी यावेळी केलं. शहरांची वाढती लोकसंख्या पोलिसांच्या ताणात भर घालते, मात्र त्यांच्या कामाची क्वचितच प्रशंसा होते असं मतही त्यांनी व्यक्त केलं.

**<u>संगीत नाटक अकादमी</u>**

सांस्कृतिक मंत्रालयानं वर्ष 2024 आणि 2025 साठीच्या 'संगीत नाटक अकादमी पुरस्करांची घोषणा केली आहे. अकादमीच्या सर्वसाधारण परिषदेनं संगीत, नृत्य, नाट्य, पारंपरिक, लोककला, आदिवासी कला आणि बाहुलीनाट्य यांसारख्या विविध क्षेत्रांतील 108 कलाकारांची 'संगीत नाटक अकादमी पुरस्कारां'साठी निवड केली आहे. तर उस्ताद बिस्मिल्लाह खान युवा पुरस्कारां'साठी 106 युवा कलाकारांचीही निवड करण्यात आली आहे. यामध्ये महाराष्ट्रातील कथक नृत्यगुरु मनीषा साठे, गायक पंडित अरुण कशाळकर, संगीत रंगभूमीवरील गायक अभिनेते मुकुंद मराठे, गायक आनंद भाटे, अभिनेते अरुण नलावडे, दिग्दर्शक प्रमोद पवार, भारूडकार भावार्थ देखणे आदींचा समावेश आहे. मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, 'उस्ताद बिस्मिल्लाह खान युवा पुरस्कारा'मध्ये 25 हजार रुपये रकमेसह ताम्रपत्र प्रदान केलं जाते. 'अकादमी फेलो'ला 3 लाख रुपये रक्कम दिली जाते, तर 'अकादमी पुरस्कारा'मध्ये 1 लाख रुपये रकमेसह ताम्रपत्र दिलं जाते. 'संगीत नाटक अकादमी फेलोशिप' आणि 'पुरस्कार' राष्ट्रपतींच्या हस्ते एका विशेष समारंभात प्रदान केले जातील.

**<u>बीड बोट मृत्यू</u>**

राज्यात विविध जिल्ह्यांमध्ये काल आठ जणांचा बुडून मृत्यु झाला. बीड जिल्ह्यातील तीर्थक्षेत्र पुरुषोत्तम पुरी इथं सिंदफणा नदी पात्रात भाविकांना घेऊन जाणारी नाव नदीच्या मध्यभागी असताना उलटली. यामध्ये 35 भाविक होते. त्यापैकी दोन महिलांचा मृत्यु झाला असल्याचं वृत्त आहे.

**<u>गोंदिया</u>**

गोंदिया जिल्ह्यतील तिरोडा तालुक्यातील बोदलकसा जलाशयात नाव उलटल्यानं दोन तरुणांचा बुडून मृत्यू झाला. जलाशय परिसरात फिरायला गेलेल्या नऊ तरुणांनी मासेमारी करणाऱ्या बोटीतून नौकाविहार करताना ही घटना घडली. यापैकी सात तरुणांना वाचवण्यात यश आलं आहे. अधिकृत जलपर्यंटनासाठीच्या नौकेचा वापर न केल्यानं ही दुर्घटना घडल्याची प्राथमिक माहिती आहे.

**<u>रत्नागिरी</u>**

रत्नागिरी जिल्ह्यात खेड तालुक्यात जगबुडी नदीत बुडून तीन भावंडाचा काल दुपारी मृत्यू झाला. मूळ सांगलीचे रहिवासी असलेले हे भाऊ सुट्टीसाठी खेडच्या नातेवाईकांकडे आले होते. पोहण्यासाठी नदीपात्रात उतरले असता खोली आणि वेग यांचा अंदाज न आल्यानं तिघे भाऊ बुडाले. एका तरुणाला वाचवण्यात स्थानिकांना यश आलं.

**<u>रायगड</u>**

रायगड जिल्ह्यातील काशिद समुद्रात बुडून काल एका पर्यटकांचा मृत्यू झाला तर दुसऱ्या पर्यटकाला जीवरक्षकानं वाचविलं. जळगाव जिल्ह्यातील ताडपत्री विक्री करणारे तीन व्यापारी काशिद इथं आले होते.

**<u>हवामान</u>**

राज्यात तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि वीजांसह हलका ते मध्यम पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**